ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष ३८ | पुणे, बुधवार, ५ एप्रिल, १९७२ | अंक ७

## तुमच्या उफाळणाऱ्या जीवनाला साजेसे ठाकरसी कापड





स्वच्छंद मजेत हवं तसं मुक्तपणे भटकणाऱ्यांसाठी ठाकरसीचं मोकळं मोकळं वाटणारं सुती कापड अगदी साजेसे असते. पॉप्लिन, लॉन्स, वॉयल्स, कॅम्ब्रिक्स – कुठेहि गेलात तरी शोभून दिसते. शहराबाहेर खेड्यापाड्यात रानोमाळ भटकत असताना किंवा शहरात प्रतिष्ठितपणे फिरत असताना वापरले तरी उपयुक्त ठरते. ठाकरसीच्या सुती कापडाने थंडावा राहतो नि मोकळे मोकळे निश्चिंत वाटते. तुमच्या आवडीची प्रिंट्स व रंग जरूर पसंत करा. रानावनातील भटक्या जीवनाची तुम्हाला हौस असेल तर त्यासाठी ठाकरसीच्या सुती कापडासारखे दुसरे कापड नाही. अगदी हवे तसे हे कापड आहे. स्वच्छंद भटकंतीसाठी मोकळे मोकळे तरल कापड. साड्या, फ्राक वगैरेंचे (ड्रेस मटेरियल) कापड, शर्टिंग व सूटिंग.

ठाकरसीचे सुती कापड न चुरगळण्याच्या चाचणीला उतरेल असे 'टेबिलाइज्ड' असते आणि आटू नये म्हणून 'सॅन्फोराइज्ड' असते.

**ठाकरसी ग्रूप ऑफ मिल्स,**
क्राउन • हिन्दुस्थान युनिट नं. १ • हिन्दुस्थान (इंडियन) युनिट नं. २
१६, अपोलो स्ट्रीट, मुंबई – १.

## सोडतीवरील कर व सोडतीचे भवितव्य

अर्थमंत्री श्री. चव्हाण ह्यांनी १९७२–७३ सालच्या अंदाजपत्रकात सोडतीत मिळणाऱ्या बक्षिसांच्या रकमांवर कर बसविला आहे. विनासायास मिळालेल्या पशावर असा कर बसविणे योग्यच म्हटले पाहिजे. पण ह्या करांमुळे राज्य सरकारांना सोडतीपासून होणाऱ्या उत्पन्नात घट होण्याची बरीच शक्यता आहे असा प्रश्न उपस्थित होतो. वास्तविक सहजी मिळालेल्या धनाचा काही भाग मध्यवर्ती सरकारचे उत्पन्न वाढविण्याकडे गेला तर नागरिकांनी कुरकूर करण्याचे कारण नाही. अलीकडे सोडतीची तिकिटे घेण्याचा लोकांचा उत्साह कमी कमी होत चालला आहे. लोकांना सोडतीचे आकर्षण वाटावे म्हणून काही राज्यांनी फार मोठमोठ्या रकमेची बक्षिसे जाहीर करून पाहिली पण त्याचाही फारसा उपयोग झालेला नाहीं. शिवाय सोडती चालविण्याचा खर्चही वाढत चाललेला आहे. सोडतीचा कारभार चालविण्यासाठी लागणाऱ्या यंत्रणेवर होणारा खर्च वाढत आहे. त्याचप्रमाणे एजंटांना द्यावयाच्या कमिशनमध्येही वाढ होत आहे. परिणामी सोडतीसाठी होणारा खर्च आणि गोळा होणारा पैसा ह्यांचे प्रमाण व्यस्त होत चालले आहे. काही राज्यांतील सोडतीत हे खर्चाचे प्रमाण ७० टक्क्यांपेक्षाही अधिक झाले आहे. उत्तर प्रदेशात खर्चाचे प्रमाण ९३·६ टके झाले आहे. म्हैसूर राज्यात ७३·६ टक्के झाले आहे आणि राजस्थानात ७० टके झाले आहे. ह्याचा अर्थ असा की काही राज्ये सोडून सोडतीला वाईट दिवस आले आहेत. ओरिसा राज्याने तर ह्या परिस्थितीचा विचार करून सोडती बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.

घोड्यांच्या शर्यतीत व मटक्यात बक्षीस मिळण्याची आशा, त्यात भाग घेणाऱ्या प्रत्येकालाच तीव्रतेने वाटत असते. त्या मानाने पैसे फार घालावे लागत नाहीत. ह्या दृष्टीने विचार करता सोडत काहीशी कमी आकर्षक ठरते. कारण, सोडतीत जाहीर झालेल्या बक्षिसांपैकी पहिले मोठे बक्षीस मिळण्याची शक्यता १ लाखात १ इतकी कमी असते. तेव्हा सोडती चालू राहण्याच्या दृष्टीने त्यांची पुनर्घटना करण्यात आली पाहिजे असे मत व्यक्त करण्यात येत आहे. अर्थमंत्री श्री. चव्हाण ह्यांनी सोडतीत मिळणाऱ्या बक्षिसावर कर बसविला असला तरी तो सोडतींना मारक होईल असा नाही. सोडतीत मिळणाऱ्या ५ हजारापर्यंतच्या बक्षिसावर कर घेण्यात येणार नाही. त्यापेक्षा अधिक रकमेच्या बक्षिसांनाच तो लागू करण्यात येणार आहे. राज्य–सरकारांनी आपआपल्या सोडतीत ५ हजार रुपयांपर्यंतच्या बक्षिसात वाढ केली तर लोकांना मिळणाऱ्या बक्षिसांच्या संख्येत वाढ होईल आणि राज्य सरकारांच्या उत्पन्नाला धक्का लागणार नाही असे सुचविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे मोठ्या बक्षिसांची रक्कम कमी करण्यात आली आणि त्याच रकमेत बसणाऱ्या बक्षिसांची संख्या वाढविण्यात आली तरही बक्षिसे मिळण्याची शक्यता अधिक होईल.

## राजदूतांनी स्वतःची विमाने वापरू नयेत

भारतामधील ज्या परदेशी राजदूतांची स्वतःच्या मालकीची विमाने असतील त्यांनी ती भारतात प्रवास करण्यासाठी वापरू नयेत असा आदेश भारत सरकारने काढला आहे. त्याऐवजी प्रवासासाठी त्यांनी इंडियन एअर लाइन्सचा उपयोग करावा असे सुचविण्यात आले आहे. अमेरिका आणि फ्रान्स ह्या दोन देशांच्या राजदूतांचीच अशी खाजगी विमाने आहेत. आणीबाणीच्या काळात त्यांना आपली विमाने न वापरण्याचा सल्ला देण्यात आला होता. अमेरिकन राजदूत मि. कीटींग ह्यांना एका प्रसंगी आपले विमान वापरण्यास परवानगी नाकारण्यात आली. भारत-अमेरिका राजनैतिक संबंध सध्या बरेच बिघडलेले आहेत. खाजगी रीत्या भारत सरकारच्या बंदीबद्दल अमेरिकन अधिकारी नाराजी व्यक्त करीत आहेत.

---

## जंबो विमानाने अधिक मालाची वाहतूक

एअर इंडिआ आपल्या जंबो विमानांनी अधिक प्रमाणावर माल वाहतूक करणार आहे. निर्यातीला उत्तेजन मिळावे आणि परदेशी चलनाची प्राप्ती व्हावी म्हणून हे धोरण स्वीकारण्यात येत आहे. सध्या एअर इंडिआ ह्या प्रचंड विमानातून दर आठवड्याला १५० टन मालाची वहातूक करीत आहे. पुढील जूनपासून आणखी ११० ते १२० टन मालाची साप्ताहिक वहातूक करण्यात येऊ लागेल. त्या सुमारास एअर इंडिआच्या जंबो विमानात आणखी दोन जंबो विमानांची भर पडेल आणि मग हवाई मार्गाने अधिक माल परदेशी पाठविणे शक्य होईल. जगातील सर्वच मोठ्या विमान कंपन्यांना सध्या आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. अधिक प्रवासी आकर्षित करण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. मालवाहतुकीत वाढ करण्यात आर्थिक तोटा भरून काढण्याचा हेतू असावा.

---

## पराभूत पाक जनरलची बोलकी मुलाखत

गेल्या डिसेंबरमध्ये झालेल्या भारत–पाक युद्धात ढाका येथे पाकिस्तानी जनरल नियाझी ह्यांनी ९० हजार सैनिकांसह शरणागती स्वीकारली. आता युद्धकैदी म्हणून दिवस कंठीत असलेल्या ह्या सेनापतीने एका डच वार्ताहराला मुलाखत दिली. मुलाखतीत ते म्हणतात की भारत-पाक युद्धात अमेरिकेने आणि चीनने पाकिस्तानचा विश्वासघात केला. अमेरिकेचे ७ वे आरमार बंगालच्या उपसागरात फक्त प्रवेश करते झाले. त्याने पाकिस्तानी लष्कराला वाचविण्याचा प्रयत्न अपेक्षेप्रमाणे केला नाही. चीननेही काही केले नाही. ह्या उलट रशिआने मात्र केलेल्या कराराला जागून भारताचा पाठपुरावा केला. सातवे आरमार बंगालच्या उपसागरात मग कशा करता आले होते, हा प्रश्नच आहे.

---

☆ अर्थ ☆

बुधवार, ५ एप्रिल, १९७२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.*

## इनकम्-टॅक्सच्या उत्पन्नात मुंबई अग्रेसर

इनकम्-टॅक्सची बाकी वसूल करण्याचा प्रश्न मुंबईत सर्वांत बिकट आहे, कारण सबंध भारतात १,००० कोटी रु. कर वसूल झाला, तर त्यापैकी २२५ कोटी रु. एकट्या मुंबईचे असतात. त्या खालोखाल कलकत्ता (१०७ कोटी रु.), दिल्ली (६२ कोटी रु.) आणि मद्रास (४८ कोटी रु.) ही शहरे येतात. सबंध भारतात जमीन महसूल आणि शेतीवरील कर ह्यांपासून फक्त ११५ कोटी रुपये मिळतात. शहरांत राहणाऱ्या लोकांवर इनकम्-टॅक्सचा बोजा अधिक जाचक असतो. कित्येक फर्म्स स्वतःच्या कर्मचाऱ्यांच्या पगारातून इनकम्-टॅक्स कापून घेतात, पण तो सरकारकडे भरीतच नाहीत. डिव्हिडंडमधून कापून घेतलेला करही स्वतःजवळ ठेवलेल्या फर्म्सची उदाहरणे आहेत. इनकम्-टॅक्सच्या दृष्टीने हा पैशांचा अपहारच होय. आता पूर्वीपेक्षा त्वरेने करवसुलीसाठी मालमत्ता विक्रीस काढण्यात येतात, त्याचा परिणाम म्हणजे मालमत्तेचे मालक नोटीस मिळताच कर भरण्यास प्रवृत्त होतात. 'समरी असेसमेंट'च्या पद्धतीमुळे प्रकरणे फार लवकर निकालात निघू शकतात. लोकांच्या इनकम्-टॅक्स पत्रके भरण्यातील सचोटीवरच ही पद्धत आधारित आहे. गेल्या वर्षी कर न भरल्याबद्दल अटक केल्याचे फक्त एकच उदाहरण घडले. फिल्म धंद्यातील लोकांच्याकडून कर वसूल करणे फार कठीण जाते. एक लक्ष रुपयांपेक्षा अधिक कराची बाकी असलेल्यात कित्येक नट-नटी, निर्माते आणि दिग्दर्शक आहेत. १९११ साली इनकम्-टॅक्सचे उत्पन्न फक्त २·४७ कोटी रुपये होते, ते आता १,००० रुपयांवर आहे. भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात इनकम्-टॅक्सचा वाटा १४% आहे. ग्रेट ब्रिटनमध्ये तो ३०%, रशियात २७% आणि अमेरिकेत २४% आहे.

---

## दरसाल १ लाख लँब्रेटा स्कूटर्स तयार करण्याचा कारखाना

उत्तर प्रदेशात स्कूटर्स तयार करणारा एक कारखाना सरकारी व खाजगी मालकीच्या संयुक्त अखत्यारीत काढण्यात येणार आहे. संकल्पित कंपनी दरसाल १ लाख लँब्रेटा स्कूटर्स तयार करणार आहे. कारखान्याच्या भाग-भांडवलापैकी ५१ टक्के भांडवल सरकार घालणार आहे आणि २० टक्के भांडवल इनोसिटी ही मूळची इटालिअन कंपनी घालणार आहे. उरलेले भांडवल मोटारीची एक खाजगी मालकीची कंपनी आणि भांडवल विक्री ह्यांच्या द्वारा उभारण्यात येईल. इटालिअन कंपनीने कारखान्याची यंत्रसामग्री आणि इतर अनुषंगिक साधने पुरविण्याचे मान्य केले आहे. कंपनीत तयार होणाऱ्या स्कूटर्स जगात विकण्याचे स्वातंत्र्य राहणार असून स्कूटरचे नावही 'लँब्रेटा' हेच कायम ठेवण्यात येईल. कारखान्याचे उत्पादन पूर्णांशाने चालू झाल्यावर त्यातील ४० हजार स्कूटर्स म्हणजे एकूण उत्पादनाच्या ४० टक्के स्कूटर्स परदेशी निर्यात करण्यात येतील. इटालिअन कंपनीला यावी लागणारी परदेशी चलनातील रक्कम ह्या निर्यातीच्या उत्पन्नातून देता येईल अशी अपेक्षा आहे. भारतातील औद्योगीकरण हळूहळू वाढत चालले आहे. त्यामुळे सायकल हे वाहन आता जुनेपुराणे वाटू लागले आहे. शिवाय औद्योगीकरणाचे फायदे मिळणाऱ्या नव्या पिढीला 'स्कूटर' ही आता सामाजिक प्रतिष्ठेची बाब वाटू लागली आहे. ह्या सर्वांचा परिणाम म्हणून स्कूटर्सची मागणी एकसारखी वाढत चालली आहे. देशातील उत्पादन वाढविल्याशिवाय मागणी भागविता येण्याची शक्यताही दृष्टिपथात येणार नाही, म्हणून परदेशी सहकार्याने देशातच स्कूटरचे उत्पादन वाढविण्यात येत आहे.

---

## भिलाईमधील मोकळे झालेले तंत्रज्ञ

एंजिनिअर्स आणि इतर कमी अधिक दर्जाचे तंत्रज्ञ ह्यांच्या बेकारीची दखल राज्य सरकारे आणि मध्यवर्ती सरकार घेत आहेत. तंत्रज्ञानाचे शिक्षण घेऊनही रोजगार न मिळालेले अनेक-जण आहेत. तसेच रोजगार असलेले तंत्रज्ञही ज्या कामावर ते सध्या आहेत, तेथील काम संपल्याने बेकार होण्याची शक्यता आहे. ह्या बाबतीत भिलाई येथील पोलाद कारखान्याचे उदाहरण देता येईल. भिलाई येथील पोलादाच्या कारखान्याचे बांधकाम आता पूर्ण होत आले आहे. त्यामुळे बरेचसे एंजिनिअर्स, पर्यवेक्षक आणि कुशल कामगार ह्यांच्या कामाची जरूरी राहिलेली नाही. ह्या बेकार तंत्रज्ञांना हिंदुस्थान स्टील कार-खान्यात सामावून घेण्याकडे आता लक्ष देण्यात येऊ लागले आहे. पण, ह्या बाबतीत जितक्या तातडीने हालचाली व्हायला पाहिजेत तितक्या होत नाहीत, अशी तक्रार करण्यात येत आहे. भिलाई पोलाद कारखान्याचे बांधकाम संपल्यामुळे ३०० सिव्हिल एंजिनिअर्स, १,३०० पर्यवेक्षक आणि ५ हजार हंगामी

कामगार हे बेकार होणार आहेत. वास्तविक ह्या लोकांच्या बेकारीची आगाऊ कल्पना होती आणि तरीही त्यांना पर्यायी नोकऱ्या देण्यासाठी वेळेवर उपाय होऊ शकले नाहीत. त्यामुळे ह्या तंत्रज्ञात असमाधान उत्पन्न झाले आहे. ह्याबाबतीत पोलाद कारखान्यांची आपसात काही योजनाही नाही. आतापर्यंत सुमारे ७० एंजिनिअर्स व १,००० तंत्रज्ञ-कामगार ह्यांना हिंदुस्थान स्टील संघटनेत घेण्याचा विचार करण्यात येत आहे बाकीच्यांचे भवितव्य अजून तरी अनिश्चितच म्हणावे लागेल.

---

### बंदरातील बुडालेल्या बोटी बाहेर काढणार

बांगला देशातील चितगाव व छालना बंदरे वाहतुकीला धोक्याची झाली आहेत. भारत-पाक युद्धात ह्या बंदरात अनेक बोटींना जलसमाधी मिळालेली आहे. ह्या बोटी बाहेर काढून बंदरे मोकळी केल्याशिवाय ती वापरता येणार नाहीत. तळाशी असलेल्या बोटी वर काढण्याचे काम एका स्वीडिश कंपनी मार्फत करून घेण्यात येणार आहे. चितगाव बंदरात सुमारे २९ बोटी उद्धाराची वाट पाहात आहेत. त्यांपैकी ५ बोटी बऱ्याच मोठ्या आहेत. एक तर ५०० फूट लांबीची आहे. अशा मोठ्या बोटी उचलून काढण्यासाठी अत्यंत आधुनिक यांत्रिक साधनांची आवश्यकता आहे. पण बुडालेल्या बोटी वर काढण्याची अशी तांत्रिक संघटना भारताजवळ अगर बांगला देशाजवळ नाही. म्हणून बांगला देश सरकारला हे काम करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटनेकडे धाव घ्यावी लागली. स्वीडिश कंपनीचे नाव संघटनेनेच सुचविलेले आहे. दरम्यान चितगाव बंदरात बोटींना नांगर टाकून स्थिर राहण्याची सोय राहिलेली नाही. बंदरातील जलातील अडथळयामुळेच भारताच्या शिपिंग कॉर्पोरेशनची 'विश्व कुसुम' ही बोट गेल्या महिन्यात बुडाली. परदेशातून बांगला देशासाठी मदत घेऊन येणाऱ्या मोठ्या बोटीही बंदराचा वापर करू शकत नाहीत. त्यामुळे बांगला देशातील लोकांना आवश्यक असणाऱ्या जीवनावश्यक वस्तू मिळणे कठीण झाले आहे. बांगला देशातील ताग व तागाच्या वस्तू बंदरातील धक्क्यावर साठून राहिल्या आहेत. आयात व निर्यात मालाची चढउतार करण्याला विलंब झाल्यामुळे बांगला देशाची अर्थव्यवस्था नीट चालू होण्यास विलंब लागत आहे. अर्थातच बंदरे तातडीने चालू करणे महत्त्वाचे झाले आहे.

---

**बांगला देशाला दिलेले साह्य —** भारताने बांगला देशाला आतापर्यंत ३०३ मालवाहू मोटारी आणि ८२ रुग्णवाहिका दिल्या आहेत. आणखी ८२ मालवाहू मोटारी त्रिपुरा येथे बांगला देशाच्या ड्रायव्हर्सची वाट पाहात आहेत. दिनाजपूर येथून आणखी ५० रुग्णवाहिकाही देण्यात येत आहेत. त्याशिवाय २,३०० दुधाच्या भुकटीच्या पिशव्या व विमानमार्गाने औषधांचाही पुरवठा करण्यात आला आहे.

### लिमिटेड कंपन्यांच्या ठेवींवरील रिझर्व बँकेची नवी बंधने

लिमिटेड कंपन्यांनी स्वीकारावयाच्या ठेवींवर रिझर्व बँकेने नुकतीच नवी बंधने लादली असून शेअर कॅपिटल व रिझर्व फंड यांच्या ५० % ठेवी यापुढे त्यांना स्वीकारता येतील. त्याचा तडाखा जास्त करून छोट्या पण सुस्थितीतील प्रायव्हेट अगर पब्लिक लिमिटेड कंपन्यांना बसणार आहे.

वस्तुस्थिती अशी आहे की उत्तम फायदा झालेल्या लिमिटेड (विशेषत: प्रायव्हेट) कंपन्यांना सरकारची जवळ जवळ ७५ ते ९० टक्के करआकारणी व फायद्यातील विशिष्ट डिव्हिडंड शेअरहोल्डर्सना वाटलाच पाहिजे हे बंधन यामुळे रिझर्व अगर इतर फंडस् याकडे वर्गवारी करण्यास फारच थोडी रक्कम दरवर्षी शिल्लक राहाते व त्यामुळे चांगला फायदा होऊनही प्रत्यक्ष कंपनीच्या स्वत:च्या भांडवल उभारणीला त्याचा फारसा उपयोग होत नाही. प्रायव्हेट लिमिटेड कंपन्यांना शेअर होल्डरच्या संख्येवर बंधन असल्याने शेअर रूपाने फार मोठे भांडवल उभारणे शक्य होत नाही, व शेवटी दैनंदिन उलाढालीसाठी अगर कोणत्याही विस्तार योजनेसाठी त्यांना ठेवींवरच जास्तीत जास्त अवलंबून राहावे लागते. सरकारने इनकम-टॅक्सचे प्रमाण कमी केले व डिव्हिडंड वाटण्यावरील बंधन काढून टाकले तरच कंपन्यांना स्वत:चे भांडवल उभे करणे शक्य होईल. फायद्यातील सिंहाचा वाटा सरकार व शेअरहोल्डर्स यांना वाटल्यावर ठेवींची परतफेड होणार तरी कशी? पूर्वीच्या ठेवी परत करण्यासाठी अगर धंद्याचा विस्तार वाढविण्यासाठी नव्या ठेवी घेणे कंपन्यांना भागच पडते. बँकांचे सहकार्य सर्वांनाच मिळते असे नाही अगर मिळालेच तर त्यांच्या बंधनामुळे क्वचित प्रसंगी धंद्याची गळचेपीच होते.

रिझर्व बँकेने शेअर कॅपिटल व रिझर्व फंड यांच्या १००% ठेवी घेण्यास मुभा दिली पाहिजे किंवा सरकारने इनकमटॅक्स ५% हून अधिक घेऊ नये. डिव्हिडंड वाटपावरील हल्लीचे बंधनही सैल केले पाहिजे. अशा प्रकारचे काही पर्याय काढल्याखेरीज छोट्या पण सुस्थितीतील लिमिटेड कंपन्या व त्यांचे ठेवीदार यांचे भवितव्य धोक्यात आल्याखेरीज राहणार नाही.

ठेवीदारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने काही बंधने आवश्यक आहेत हे जरी मान्य केले तरी चोहोबाजूंनी कंपन्यांवर निर्बंध घालून त्या चालविणे अशक्य करून सोडणे हे योग्य नाही. प्रामाणिक व सज्जन कंपनी-संचालकांनाच यात अधिक धोका आहे.

श्रीधर गोपाळ श्रीखंडे
कोल्हापूर

---

**ट्रॅक्टर्ससाठी टेंडर्स मागविणार —** हरियाणा सरकारला ६ हजार ट्रॅक्टर्स विकत घ्यावयाचे आहेत. ते मिळविण्यासाठी सरकारने जगातून टेंडर्स मागविण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या वर्षी ह्यासंबंधी जागतिक बँकेशी एक करार करण्यात आला होता. त्यास अनुसरून टेंडर्स मागविण्यात येणार आहेत.

## सार्वजनिक क्षेत्रात काम करणारे उसने अधिकारी

भारताच्या संमिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक मालकीचा विभाग उघडण्यात आल्यावर त्या विभागाला अनुभवी वरिष्ठ अधिकाऱ्यांची टंचाई भासू लागली. म्हणून मध्यवर्ती सरकारच्या मंत्र्यांच्या कचेरीत अगर सरकारी खात्यांत काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना उसने म्हणून सार्वजनिक क्षेत्रात जबाबदारीच्या जागांवर धाडण्यात आले. ह्या अधिकाऱ्यांनी आपणास आहे तेथेच काम करावयाचे आहे का परत पहिल्या जागावर रूजू व्हावयाचे आहे ह्यासंबंधीचा आपला निर्णय फेब्रुआरी १९७२ अखेर सरकारला कळवावयाचा होता. एकूण ८५ अधिकाऱ्यांची उसनवारी सार्वजनिक मालकीच्या विभागाने केली होती. त्यांपैकी सुमारे ५० अधिकाऱ्यांनी म्हणजे ६० टक्के अधिकाऱ्यांनी सार्वजनिक क्षेत्रातच काम करीत राहण्याचा आपला मानस सरकारला कळविला आहे. उरलेल्या अधिकाऱ्यांपैकी निम्म्या अधिकाऱ्यांनी परत पहिल्या जागांवर रूजू होण्याची इच्छा व्यक्त केली आहे. बाकीच्यांनी निर्णय घेण्यास अधिक वेळ देण्यात यावा अशी मागणी केली आहे. उसनवारी देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचा पहिला गट दरमहा २,५०० रुपयांपेक्षा अधिक पगार मिळविणारा आहे. ते सर्व अध्यक्ष, मॅनेजिंग डायरेक्टर, जनरल मॅनेजर अगर फिनॅन्शिअल अॅडव्हायसर ह्यासारख्या मोठ्या जागांवर काम करीत आहेत. बहुतेक जण आता सेवानिवृत्तीच्या वयाच्या जवळपास आलेले असल्याने त्यांना निर्णय घेणे जड गेले नाही. कारण सेवानिवृत्त झाल्यानंतर ते सरकारी नियमाप्रमाणे पूर्ण निवृत्तिवेतनाला पात्र होणार आहेत. ज्या अधिकाऱ्यांनी सार्वजनिक क्षेत्रात अलीकडे पदार्पण केले आहे व ज्यांची मूळची नोकरी १० वर्षांनी संपणार आहे त्यांची मात्र पंचाईत झाली आहे. कारण सार्वजनिक क्षेत्रात राहिल्यास त्यांना सरकारी निवृत्तिवेतन कमी मिळणार आहे.

---

## सहा हेक्टरपेक्षा कमी जमीनधारणा ठेवण्यास विरोध

जमीनधारणेच्या कायद्यात बदल करून कमाल जमीन ठेवण्यावर नियंत्रण घालण्याचे प्रयत्न भारतभर राज्य सरकारांमार्फत करण्यात येत आहेत. पंजाब शेतकी विद्यापीठाचे उपकुलगुरू ह्यांनी ह्यासंबंधी आपला अभिप्राय व्यक्त केला आहे. ते म्हणतात की हिंदुस्थानात कमाल जमीनधारणेची मर्यादा सहा हेक्टरपेक्षा कमी ठेवण्यात आली तर शेतीच्या व्यवसायाचे कंबरडेच मोडल्यासारखे होईल. ह्यासंबंधी करण्यात आलेल्या प्रयोगावरून असे दिसून आले आहे की ६ हेक्टरपासून ८ हेक्टर जमीन असलेली शेतीच शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या परवडू शकते आणि हरित क्रांतीला आलेला वेग चालू ठेवण्यास त्याला प्रोत्साहन देऊ शकते. अन्यथा शेतकऱ्याला नवीन उत्पादनतंत्र अवलंबून शेती अधिक किफायतशीर करण्यास लागणारी प्रेरणाच शिल्लक राहणार नाही.

## मानसिक ताण व अस्वस्थतेबद्दल नुकसानभरपाई

अलीकडे विमानाच्या हाकाऱ्यांना धाक दाखवून ते भलत्याच ठिकाणी उतरविण्यास लावण्याचे प्रकार वढत आहेत. अशा विमानातून प्रवास करणाऱ्या दुर्दैवी प्रवाशांवर फार मोठी आपत्ति कोसळलेली असते. तिचा परिणाम प्रवाशांच्या मनःस्थितीवर अतिशय वाईट होण्याची शक्यता असते. तेव्हा ज्या विमानकंपनीचे विमान अशा रीतीने पळविले जाईल त्या कंपनीकडून मनःस्वास्थ्य बिघडण्यास कारणीभूत झाल्याबद्दल प्रवाशांना कंपनीकडून नुकसानभरपाई मागता येईल की नाही? अमेरिकेतील न्यूयॉर्क राज्याच्या सर्वोच्च न्यायालयातील एका न्यायाधीशाने ह्या बाबतीत होकारार्थी निर्णय दिला आहे. न्यूयॉर्कहून फ्रँकफूर्टला जाणाऱ्या एका विमानाला १९७० मध्ये पळविण्यात आले होते. त्यातील एका १८ वर्षांच्या तरुणीने नुकसानभरपाईचा दावा लावला होता. तिला ७५ हजार डॉलर्स भरपाई मिळाली.

---

## "किशोर" मासिकाचे स्वागत

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळातर्फे खास मुलांसाठी हे मासिक प्रसिद्ध होत आहे. "मुलांना निर्दोष व करमणूकप्रधान साहित्य पुरवून त्यांची चांगल्या वाचनाची हौस भागवावी" ह्यासाठी हे मासिक मुद्दाम सुरू करण्यात आले आहे. बालमित्रांच्या, सर्वांगाने, सर्वांशाने, फुलणाऱ्या काळात त्यांना काही मदत करता आल्यास ती करण्याचा किशोरचा विचार आहे. त्यांच्या मनाची स्वाभाविक गरज उत्तम रीतीने भागविणारे विपुल साहित्य त्यांना देणे, रुचतील असे विषय सहज समजेल अशा भाषेत मांडणे, आकर्षक आणि उद्बोधक चित्रे देणे, इत्यादी मार्गांनी 'किशोर' हा साथी साथ करणार आहे. प्रसिद्ध झालेल्या अंकांवरून उद्देशाप्रमाणे प्रत्यक्ष कार्य होत आहे, हे नमूद करण्यास आनंद वाटतो. सुंदर, रंगीत चित्रांनी आणि आकर्षक माहितीने परिपूर्ण असे हे मासिक खासच किशोरप्रिय होईल.

---

## सहकारातील भ्रष्टाचाराच्या चौकशीसाठी फिरती पथके

सहकारी संस्थांतील भ्रष्टाचार, अफरातफर व गैर कारभाराच्या अर्जांची त्वरित चौकशी व्हावी म्हणून महाराष्ट्र शासनाने प्रत्येक विभागासाठी एका फिरत्या पथकाची नेमणूक केली आहे.

सहकारी संस्थांबाबत भ्रष्टाचार किंवा अफरातफरीबाबत जे अर्ज किंवा तक्रारी शासनाकडे किंवा सहकारी खात्यांच्या अधिकाऱ्याकडे येतील त्यांची त्वरित चौकशी या पथकाकडून होईल. या पथकाला त्याच्या विभागातील कोणत्याही संस्थेला अगोदर सूचना न देता आकस्मित भेट देऊन संस्थेची रोकड माल व इतर जायदाद यांची तपासणी करण्याचा, सर्वसंबंधित नोकरवर्ग किंवा कार्यकारिणी सभासदांचे जबाब घेण्याचा संपूर्ण अधिकार देण्यात आला आहे.

## बांगला देशातील सध्याची परिस्थिती

पाकिस्तानातून फुटून स्वतंत्र झालेल्या बांगला देशाचा पहिला वर्धदिन नुकताच साजरा झाला. आता त्या देशात सगळे स्थिरस्थावर झाल्यासारखे दिसते. ५० पेक्षा अधिक देशांनी नव्या बांगला प्रजासत्ताकाला मान्यता दिली आहे. त्यांत ब्रिटन, फ्रान्स व रशिआ ही बडी राष्ट्रेही आहेत. अमेरिकेची मान्यताही लवकरच मिळणार आहे. परंतु ह्याचा अर्थ तेथील सर्व प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहेत असे नाही ढाक्यासारख्या राजधानीत एकंदरीने शांतता नांदत असली तरी इतरत्र परिस्थिती स्थिरावलेली नाही. पाकिस्तानी लष्कराविरुद्ध लढलेल्या अनेकांजवळ अजूनही शस्त्रे आहेत त्यांचा अजून संपूर्ण पत्ता लागलेला नाही. अर्थव्यवस्था सुरळीत झालेली नाही. धान्य व इतर गरजेच्या वस्तूंच्या किमती वाढत आहेत. त्याचा फायदा राजकीय दृष्टीने घेण्याचे प्रयत्न होत आहेत. बांगला देशामधील राज्यकारभार हाकणाऱ्या नोकरवर्गात अनेकजण पाश्चिमात्य देशांवर अधिक भिस्त ठेवणारे आहेत आणि त्यात नवल वाटण्यासारखेही काही नाही. कारण, ही नोकरशाही पाकिस्तानी अंमल असतानाचीच आहे. बांगला देशाची पुनर्रचना करण्यासाठी लागणारा पैसा भारत एकटा पुरवू शकणार नाही. बड्या देशांच्या मदतीची अर्थातच अपेक्षा करण्यात येत आहे. ह्या बड्या देशांपैकी अमेरिकेकडून मिळू शकणाऱ्या मदतीची फार जरूरी आहे. इतर देशांपेक्षा अमेरिकाच अधिक मदत देऊ शकेल ह्याची जाणीव ढाक्यात आहे. दरम्यान ढाक्यात रशिआचे प्रचार वाङ्मय मोठ्या प्रमाणावर येत आहे. चीनही बांगला देशाशी संबंध जोडण्याच्या मनःस्थितीत येत आहे.

## जनन नियंत्रणासाठी भ्रूणहत्येचा फार मोठा वापर

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या लोकसंख्या मंडळाने जनन नियंत्रण करण्यासाठी जगभर वापरण्यात येणाऱ्या उपायासंबंधी १६२ पानांचा एक विस्तृत अहवाल तयार केला आहे. अहवालात ग्रथित केलेल्या माहितीप्रमाणे जननसंख्या नियंत्रित करण्यासाठी सर्व जगभर भ्रूणहत्त्येचाच सर्वांत अधिक उपयोग करण्यात येतो. भ्रूणहत्त्या कायदेशीर रीत्या आणि चांगल्या परिस्थितीत करण्यात आली तर त्यापासून गंभीर धोका संभवत नाही असे अहवालात नमूद करण्यात आले आहे. ह्या संबंधीची आकडेवारी देण्यात आली आहे. १ लाख भ्रूणहत्त्या करण्यात आल्या तर त्यामागे होणाऱ्या मातांच्या मृत्यूंची संख्या पुढीलप्रमाणे दिसून आली आहे. हंगेरी १·२; झेकोस्लोव्हाकिआ २·५; जपान ५·१; युगोस्लाव्हिआ ४·५; स्वीडन ३९ आणि डेन्मार्क ४१. कम्युनिस्ट देशांत बेकायदेशीर रीत्या करण्यात येणाऱ्या हत्त्यांचे प्रमाण कमी आहे. शिवाय, तेथे गर्भ राहिल्यापासून तीन महिन्यांच्या आतच शस्त्रक्रिया कायदेशीरपणे करता येते. ह्या पद्धतीमुळे मातांच्या मृत्यूंचा संभवात कम्युनिस्ट देशांच्या व इतर देशांच्या बाबतीत फार मोठा फरक पडलेला दिसतो. गर्भारपणामुळे अगर नैसर्गिक जननाच्या प्रक्रियेत घडून येणाऱ्या मातांच्या मृत्यूंचे प्रमाण विकसित देशात २ लाखात २० असे आहे तर अविकसित देशात ते ३० आहे. पुरुषावर करण्यात येणारी शस्त्रक्रिया सर्वांत उपयुक्त आहे. पण ती सुधारता येण्याची शक्यता नसते. स्त्रियांवरील शस्त्रक्रिया भ्रूणहत्त्येपेक्षा अधिक धोक्याची दिसून आली. १ लाख शस्त्रक्रियांमागे २५ मृत्यू इतके हे प्रमाण आहे. ब्रिटनमध्ये जनन नियोजन करणाऱ्या १ लाख स्त्रियांमागे तीन असे मृत्यूचे प्रमाण दिसून आले.

## "स्वस्तिक" चे श्री. वाघोलीकर व श्री. रावत मॉरिशसला रवाना

स्वस्तिक रबर प्रॉडक्टसमधील श्री. डी. डी. वाघोलीकर व श्री. एच. आर. रावत विमानाने मॉरिशसला तीन आठवड्यांपूर्वी रवाना झाले. मॉरिशसमधील आय. जी. एम. इंडस्ट्रीजकडे स्वस्तिकतर्फे हे दोघे डेप्युटेशनवर गेले आहेत.

श्री. वाघोलीकर गेली २० वर्षे स्वस्तिकमध्ये आहेत. ते लॅटेक्स खात्यामध्ये सुपरवायझर असून आपल्या कार्यकौशल्यामधून त्यांनी आपले सहकारी व कंपनीच्या व्यवस्थापकामध्ये आगळे स्थान प्राप्त केले आहे. निष्ठापूर्वक काम करून त्यांनी स्वतःची उत्तम पात्रता सिद्ध केली आहे. श्री. रावत हे १९५७ पासून स्वस्तिकमध्ये आहेत. एक हुशार कामगार म्हणून श्री. रावत यांनी लौकिक प्राप्त केला आहे. आता हे दोघेही आपल्या कार्यकौशल्याचा उपयोग करून देण्यासाठी मॉरिशसला गेले आहेत.

स्वस्तिकतर्फे या दोघांनाही हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या. आय. जी. एम. इंडस्ट्रीज हा स्वस्तिकच्या साहाय्याने मॉरिशस-मध्ये उभारलेला संयुक्त प्रकल्प आहे. लॅटेक्स या कच्च्या रबरापासून येथे रबरउत्पादन केले जाणार आहे.

## अमेरिकन कंपन्यांना रशिआचे गिऱ्हाईक हवे

रशिआ आणि अमेरिका ह्यांच्यामधील व्यापारावर सध्या बरीच बंधने आहेत. रशिआचे लष्करी सामर्थ्य वाढवू शकणारा प्रगत औद्योगिक माल अमेरिकन कंपन्या रशिआला निर्यात करू शकत नाहीत. प्रे. निक्सन येत्या मे महिन्याच्या २२ तारखेस मॉस्कोला भेट देणार आहेत. ह्या भेटीतून उभयता देशांतील व्यापार अधिक खुला होण्याची शक्यता आहे. ही गोष्ट ध्यानात घेऊन अमेरिकन कंपन्यांचे अनेक प्रतिनिधी रशिअन सरकारी खात्यांशी संबंध ठेवून आहेत. रशिआ एक बडे गिऱ्हाईक होऊ शकेल अशी त्यांची खात्री आहे. त्यातल्या त्यात गणक यंत्रे आणि त्यांचे तंत्रज्ञान ह्यासंबंधी रशिआची भूक फार मोठी आहे. हे एकच क्षेत्र हाती लागले तरी अमेरिकन कंपन्यांना कोट्यवधी डॉलर्स किमतीच्या मागण्या मिळू शकतील.

# ठेवीत एका वर्षात साडेतीन कोट रुपयांची वाढ

## महाराष्ट्रातील अग्रेसर बँकेची भरीव प्रगती

**युनायटेड वेस्टर्न बँकेचे अध्यक्ष**

**वि. श्री. दामले**

## यांचे भागधारकांचे सभेत भाषण



**भारत-पाक संघर्ष :** गेल्या डिसेंबर महिन्यात झालेल्या भारत-पाक युद्धात जे जवान धारातीर्थी पडले त्यांना मी माझी श्रद्धांजली अर्पण करतो. देशाकरिता त्यांनी केलेले प्राणार्पण वाया जाणार नाही आणि देशातील सर्व नागरिक त्यांच्या कुटुंबियांची काळजी वाहतील याची मला खात्री वाटते. बँकेने या बाबतचे आपले कर्तव्य पार पाडण्याच्या दृष्टीने एक "जवान कल्याण कर्ज योजना" सुरू केलेली आहे.

**बँकिंग कमिशन :** बँकिंग कमिशनने आपला सविस्तर अहवाल नुकताच केन्द्र सरकारला सादर केला असून त्यामध्ये बँकिंग व्यवसायावर दीर्घ स्वरूपाचा परिणाम करणाऱ्या अनेक शिफारशी आहेत. त्या अमलात आणण्याच्या दृष्टीने केंन्द्र सरकार पावले टाकील अशी आशा मी व्यक्त करतो.

**शेती-कर्जे :** शेती व्यवसायास व्यापारी बँकांनी वाढत्या प्रमाणावर कर्जे देणे आवश्यक आहे हे खरे असले तरी महाराष्ट्र राज्यात तरी निदान याबाबत सहकारी बँकांनी आजपर्यंत बजाविलेल्या कामगिरीच्या अनुरोधाने या धोरणात बदल करण्याची जरुरी आहे असे मला वाटते. या राज्यात सहकारी चळवळ अतिशय प्रभावी असून सहकारी बँकांनी शेती-कर्जाबाबत मोलाचा अनुभव मिळविलेला आहे. या अनुभवाचा योग्य असा उपयोग करून घ्यावयाचा असेल तर या बँकांतर्फेच शेती-कर्जव्यवहार करणे अधिक उपयुक्त होईल. जमीन विकास बँकांनी काढलेली डिबेंचर्स विकत घेऊन ज्याप्रमाणे व्यापारी बँका अप्रत्यक्षपणे शेतीच्या विकासास हातभार लावत आहेत त्याप्रमाणे पीक-कर्जे व इतर स्वरूपाची शेती-कर्जेही व्यापारी बँकांनी अप्रत्यक्ष स्वरूपात दिल्यास सहकारी बँकांनी उभारलेल्या यंत्रणेचा उपयोग होऊन कर्जपुरवठा कार्यक्षमतेने होईल. विशेषत: खाजगी क्षेत्रातील लहान व्यापारी बँकांच्या याबाबतच्या मर्यादा लक्षात घेता त्यांना हा मार्ग अधिक सोयीस्कर ठरेल असे मला वाटते.

**सुरक्षा-निधी :** शेती-कर्जे तसेच इतर अग्रक्रमाच्या क्षेत्रांना दिलेली कर्जे अधिक प्रमाणावर उपलब्ध होण्याकरिता बँकांनी आपल्या नफ्यातून एक वेगळा सुरक्षा-निधी उभारावा आणि हा निधी इन्कम्-टॅक्सपासून मुक्त असावा. असा निधी निर्माण केल्याने अशा प्रकारच्या कर्जव्यवहारातील संभाव्य धोका सहन करण्याची बँकांची ताकद वाढेल आणि त्यामुळे त्या अधिक आत्मविश्वासाने या क्षेत्रात कार्य करू शकतील.

**ग्रामीण डिबेंचर्स :** राज्यातील मागास विभागातील विकास योजनांना अधिक गती मिळण्याकरिता महाराष्ट्र राज्य सरकारने विशिष्ट योजनांकरिता ग्रामीण डिबेंचर्स काढावीत अशी माझी आग्रहाची सूचना आहे. ही डिबेंचर्स अॅप्रूव्हड सिक्युरिटी म्हणून गणली जातील आणि त्यांचा व्याजाचा दर थोडा जास्त ठेवल्यास व्यापारी बँका ही डिबेंचर्स मोठ्या प्रमाणावर खरेदी करू शकतील. विशेषत: शेतीसंबंधी नवीन विकास योजना सुरू करण्याकरिता हा उपाय निश्चितच प्रभावी ठरेल.

**कर्जव्यवहारांवरील नियंत्रणे :** काही ठराविक मालाच्या तारणावरील कर्जव्यवहारावर रिझर्व्ह बँकेची जी बंधने (सिलेक्टिव्ह क्रेडिट कंट्रोल) आहेत ती लहान बँकांना विशेष जाचक ठरत आहेत. या मालाचे भाव वाढू नयेत म्हणून अशी नियंत्रणे घालणे आवश्यक आणि अटळ असले तरी देखील लहान बँकांच्या या बाबतच्या अडचणी व मर्यादा लक्षात घेता मूळ उद्देशाला बाधक न ठरता देखील ही बंधने या बँकांच्या बाबतीत शिथील करण्यास निश्चितच वाव आहे. विशेषत: नवीन शाखांच्या बाबतीत या बंधनापासून सवलती दिल्याशिवाय या शाखा स्वावलंबी तर बनणार नाहीतच परंतु ज्या त्या भागांचा विकास करण्याचे त्यांचे कर्तव्यही त्या व्यवस्थितपणे पार पाडू शकणार नाहीत. मोठ्या शहरांत जास्त प्रमाणावर व्यापारी बँकांना शाखा उघडता याव्यात म्हणून रिझर्व्ह बँकेने या बाबतच्या धोरणात जो नुकताच बदल केला आहे त्याचे मी स्वागत करतो. असा बदल व्हावा असा मी माझ्या गेल्या दोन-तीन वर्षांच्या भाषणांत आवर्जून उल्लेख केला होता.

**ठेव वाढ; व्याजदरात वाढ :** सन १९७१ मध्ये देशातील व्यापारी बँकांच्या ठेवीमध्ये समाधानकारक वाढ झालेली असली तरी देखील ती आवश्यकतेपेक्षा बरीच कमी आहे. या दृष्टीने ठेवीवरील व्याजाच्या दरात वाढ करावयास पाहिजे असे माझे प्रांजळ मत आहे. देशात आज सर्व क्षेत्रात व्याजाच्या दरात वाढ झालेली असताना त्यातील योग्य तो हिस्सा बँकांकडील ठेवीदारांना नाकारणे अयोग्य आहे. माझी अशी सूचना आहे

की, रिझर्व्ह बँकेने ठेवीवरील व्याजदरात वाढ करण्यास बँकांना परवानगी द्यावी. त्याचप्रमाणे लहान बँकांना मोठ्या बँकांपेक्षा कमीत कमी अर्धा टक्का तरी जास्त व्याजदर देण्यास मुभा दिली जाणे आवश्यक आहे. तसेच सहकारी बँकांकडील ठेवींना डिपॉझिट इन्शुअरन्स कॉर्पोरेशन कायदा लागू केला जात असताना या बँका ठेवींवर जे व्याज देतात त्यावर इतर व्यापारी बँकांप्रमाणेही बंधने असावीत.

इनकम्-टॅक्स कायद्यातील बँकांकडील ठेवीसंबंधाच्या काही तरतुदी दूर केल्या गेल्या तर ठेवींचा ओघ बँकांकडे वाढत्या प्रमाणावर वळू शकेल. केंद्र सरकारने याबाबत आपुलकीने लक्ष घालावे अशी माझी विनंती आहे.

**भाग भांडवल :** आपल्या बँकेचा वाढता व्याप आणि तिच्या ठेवींमध्ये दर वर्षी होणारी वाढ याचा विचार करता आपल्याला लवकरच नवीन भाग-भांडवल विक्रीस काढावे लागेल.

**ठेवी :** मला हे नमूद करण्यास अत्यंत आनंद वाटतो की, अहवाल साली बँकेच्या ठेवींमध्ये अतिशय चांगली म्हणजे रु. ३५१·९८ लाखांची वाढ झालेली आहे. बँकेच्या एकूण ठेवी आता रु. १७॥ कोटींचे वर गेल्या आहेत.

**नफा व डिव्हिडंड :** या वर्षी बँकेच्या नफ्यात रु. १·५९ लाखांची म्हणजे ३४ टक्क्यांची झालेली वाढ विशेष संतोषकारक आहे. बँकेच्या डिव्हिडंडमध्ये वाढ करून ते १० टक्के करावे अशी संचालक मंडळाने शिफारस केलेली आहे. सन १९७० मध्ये डिव्हिडंड ९ टक्क्यांवरून वाढवून ९॥ टक्के करण्यात आलेले होते आणि लागलीच दोन वर्षांत ते पुन्हा वाढवून १० टक्के करण्यात आले आहे.

**शाखाविस्तार :** वर्षअखेर बँकेच्या शाखांची एकूण संख्या ५४ झाली. तसेच महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या दोन विभागातील सर्व जिल्ह्यांत आता आपल्या बँकेच्या शाखा स्थापन झालेल्या आहेत.

मला आपणास सांगावयास आनंद वाटतो की, चालू वर्षी बँकेने याबाबतच्या प्रगतीचा आणखी एक मोठा टप्पा गाठला असून विदर्भ विभागात आपल्या शाखा नुकत्याच सुरू केल्या आहेत. याच महिन्यात नागपूर, अमरावती, वर्धा, यवतमाळ, खामगाव व मलकापूर या सहा ठिकाणी आपण शाखा उघडल्या असून पुढील महिन्यात अकोला येथील शाखा उघडली जाईल.

**सबसिडियरी कंपनी :** बँकेची सबसिडियरी कंपनी 'दि वेस्टर्न इंडिया ट्रस्टी अॅन्ड एक्झिक्युटर कं. लि.' हिने अहवाल साली रौप्यमहोत्सव शानदारपणे साजरा केला. या कंपनीची अहवाल सालची प्रगती समाधानकारक असून तिने गेल्या वर्षा-इतकेच म्हणजे ५ टक्के डिव्हिडंड जाहीर केले आहे.

**समारोप :** आपल्या बँकेने सन १९७१ मध्ये जी समाधानकारक प्रगती केली आहे त्याचे श्रेय सर्व भागधारक, खातेदार, हितचिंतक व नोकरवर्ग या सर्वांनाच आहे. आपल्या आजपर्यंतच्या परंपरांना अनुसरूनच ही प्रगती धीमेपणाने परंतु खंबीरपणाने चाललेली आहे. यामध्ये आपल्या बँकेच्या संस्थापकांच्या पुण्याईचा वाटाही बराच मोठा आहे.

---

### २६ वर्षांपूर्वीचा खटला निकालात निघाला

पूर्वीच्या इंपिरिअल बँकेच्या अलाहाबाद शाखेतील कपिल देव शुक्ला ह्यावर १९४६ साली इंडियन पीनल कोडाच्या ४०८ व ४७७ अ कलमाखाली खटला भरण्यात आला होता. मॅजिस्ट्रेटपुढे तो चालून सेशन्स कोर्टाकडे धाडण्यात आला. सेशन्स कोर्टाने त्याला दोषमुक्त ठरविले. सरकारने त्यावर अपील केले आणि हायकोर्टाने त्याला ४ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा ठोठावली. शुक्लाने १९५७ मध्ये सुप्रीम कोर्टाकडे अपील केले. "ज्यूरीमधील बहुसंख्य ज्यूरर्सना इंग्रजी येत नव्हते, तेव्हा दस्त बनावट होते किंवा नाही हे ठरविता येणे त्यांना शक्य नव्हते" हा आरोपीचा बचाव सुप्रीम कोर्टाने ग्राह्य धरून त्याची मुक्तता केली.

---

### संगीत दिग्दर्शकाच्या फ्लॅटवर 'छापा'

सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक लक्ष्मीकांत ह्यांच्या मुंबईमधील फ्लॅटवर सहा जणांनी आपण सी. बी. आय. चे अधिकारी आहोत असे भासवून दि. २१ फेब्रवारी रोजी छापा घातला. "गेल्या काही वर्षांत तुम्ही १०० पेक्षा जास्त बोलपटांचे संगीत दिग्दर्शन करून अफाट पैसा मिळविला आहे आणि तुमच्या घरात ४० लक्ष रुपये रोकड काळा पैसा आहे, अशा माहितीवरून गृहखात्याने आम्हांस पाठविले आहे" असे तोतया 'सुपरिंटेंडेंट ऑफ पोलिस'ने लक्ष्मीकांतला सांगितले. तोतया 'असिस्टंट सुपरिंटेंडेंट'ने लक्ष्मीकांतला बाजूला नेऊन '४०,००० रु. दिले तर प्रकरण मिटवून टाकू' असे सांगितले. 'लक्ष्मीकांतने आपल्या पत्नीचा सल्ला घेतला आणि जवळचे १०,००० रु. दिले. तोतया अधिकाऱ्यांना टेबलावर चेकबुक दिसले, तशी त्यांनी लक्ष्मीकांतकडून १०,००० रु. चा चेक लिहून घेतला. लक्ष्मीकांतच्या मेव्हण्याच्या मध्यस्तीने त्यांनी बँकेच्या ताडदेव शाखेत तो कॅश केला. दुसऱ्या दिवशी लक्ष्मीकांत साशंक होऊन त्याने पोलिसात तक्रार नोंदविली. लक्ष्मीकांतचे सेक्रेटरी मल्होत्रा ह्यांच्या गैरहजेरीत त्यांच्या बहिणीकडून असेच ३,५०० रु. त्याच दिवशी उकळले होते. पोलिसांनी आरोपींना पकडले तेव्हा त्यांच्याजवळ बनावट वारंट फॉर्म्स, लक्ष्मीकांतकडून उकळलेले १०,००० रु., इत्यादीही सापडले. चित्रपट व्यवसायातील अनेकांना असे फसविण्यात आले आहे, पण ते तक्रार करण्यास साहजिकच पुढे येत नाहीत!

---

**स्टेट बँकेच्या इमारतीचे नुकसान —** मुंबई येथील नरिमन पॉइंटवरील स्टेट बँकेच्या २२ मजली इमारतीस आग लागली, त्यामुळे १·२१ कोटी रुपयांचे नुकसान झाले.

# मध्यवर्ती बजेटात ३७५ कोटी रु. ची तूट

[ योजनेसाठी आणखी ७१० कोटी रु.ची तरतूद, समाज कल्याणासाठी २४० कोटी रु., बांगला देशाला २०० कोटी रु. ची मदत, गतवर्षीचे खास कर चालू राहणार, १९७१-७२ मध्ये ३८५ कोटी रु. ची तूट, राज्यांचे ओव्हरड्राफ्ट हळूहळू कमी करणार, अन्नमदतीसाठी १०० कोटी रु. ची तरतूद. ]

सन १९७२-७३ मध्ये सध्याच्या कराच्या दरानुसार अर्थसंकल्पात ३७५ कोटी रुपये तूट असेल असे केंद्रीय अर्थमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी सर्वसाधारण अर्थसंकल्प संसदेला सादर करताना सांगितले. महसूलखाती २१९ कोटी रुपये शिल्लक असतील परंतु ही शिल्लक भांडवली खाती येणाऱ्या ५९४ कोटी रुपयांच्या तुटीमुळे निकालात निघेल.

सन १९७२-७३ सालच्या अर्थसंकल्पाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यंदा योजनेच्या तरतुदीमध्ये लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. केंद्र राज्ये व केंद्रशासित प्रदेशांसाठी यंदाच्या ३२६३ कोटी रु.च्या मानाने पुढील वर्षासाठी ३९७३ कोटी रु. ची तरतूद करण्यात आली आहे. याचाच अर्थ असा की, त्यात ७१० कोटी रु. अथवा २२ टक्के वाढ झाली आहे.

सामाजिक न्याय व आर्थिक विकास यांच्या योजनांसाठी अर्थसंकल्पात २४० कोटी रु. ची तरतूद करण्यात आली आहे. त्यातील एक नवे वैशिष्ट्य म्हणजे ग्रामीण पाणीपुरवठा, ग्रामीण भागांतील घरांसाठी जागा, गलिच्छ वस्तीनिर्मूलन व सुधारणा, प्राथमिक शिक्षण व सुशिक्षित बेकारांसाठी योजना यांसाठी १२५ कोटी रु. ची एकमुठी तरतूद करण्यात आली आहे. एकमुठी तरतूद केली की काही परिणामकारक काम प्रत्येक राज्यात करता येईल, अशी अपेक्षा आहे.

बांगला देशाला आतापर्यंत १३० कोटी रु. च्या मदतीचे आश्वासन देण्यात आले आहे. सरकारचा इरादा २०० कोटी रु. ची मदत देण्याचा आहे व त्यांपैकी ८२ कोटी रु. चे वाटप १९७१-७२ मध्ये करण्यात येईल व उर्वरित मदत १९७२-७३ मध्ये देण्यात येईल.

सन १९७१-७२ मध्ये संरक्षण खर्च १४११ कोटी रु. च्या घरात जाईल असा अंदाज करण्यात आला आहे. अर्थसंकल्पातील १२४१ कोटी रु. च्या तरतुदीपेक्षा हा अंदाजे १७० कोटी रु. नी अधिक आहे. पुढील वर्षात संरक्षणासाठी, दुरुस्त अर्थसंकल्पाएवढीच म्हणजे १४०८ कोटी रु. ची तरतूद करण्यात आली आहे.

सध्याच्या परिस्थितीत गेल्या वर्षी सुरू केलेले खास कर चालू ठेवणे अपरिहार्य आहे. या करांमुळे पुढील वर्षी ७० कोटी रुपये उत्पन्न येईल. चालू वर्षी या करामुळे २० कोटी रुपये मिळाले होते. आयकर व कंपनी-करांचे उत्पन्न ९८५ कोटी रुपयांवरून १९७२-७३ मध्ये १०६० कोटी रुपये होईल. अबकारी करांचे उत्पन्न २१०३ कोटी रुपयांवरून २२३० कोटी रुपये व जकातीपासून ६५९ कोटी रु. वरून ७०० कोटी रु. असे उत्पन्न वाढेल परंतु दुर्दैवाने हे वाढीव उत्पन्न हातात पडणार नाही कारण अन्नमदत चालू वर्षातील ३० कोटी रु. वरून पुढील वर्षी १०० कोटी रु. पर्यंत वाढविण्याचा इरादा आहे.

अन्नधान्याच्या उत्पादनातील वाढीमुळे दुसऱ्या मार्गाने अर्थव्यवस्थेवरील ताण वाढला आहे. १९७२-७३ वर्षात देशातील अन्नधान्याचा राखीव साठा हलवण्यासाठी भारतीय अन्न महामंडळाला आणखी १२० कोटी रु. लागतील असा अंदाज आहे. अर्थसंकल्पी तरतूद फक्त २५ कोटी रु. ची राहील, उरलेली ९५ कोटी रु. ची रक्कम महामंडळाला बँकांकडून कर्जरूपाने घ्यावी लागेल.

आगामी वर्षात परकीय कर्जांच्या मदतीत बरीच घट होऊन ती ४६९ कोटी रु. वरून ३७४ कोटी रु. होईल, असा अंदाज आहे. अलीकडेच घडलेल्या काही घटनांमुळे आपणांस पुन्हा असे दिसून आले आहे की, अधिक विकास व समाजकल्याण या दिशेने जोरदार प्रयत्न करताना परकीय मदतीवर कमी प्रमाणात अवलंबून राहण्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. निर्यातीत वाढ करून आणि आयात वस्तूंबद्दल पर्यायी वस्तू निर्माण करून स्वावलंबनाचा मार्ग चोखळण्याचे सर्वतैव प्रयत्न केले पाहिजेत.


### दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प

( आकडे कोटी रु.त )


| महसूल | १९७१-७२ चा अर्थसंकल्प | १९७१-७२ चा दुरुस्त अर्थसंकल्प | १९७२-७३ चा अर्थसंकल्प |
|---|---|---|---|
| उत्पन्न | ३७२७ | ४०८१ | ४२४२ |
| | | | +१३३ * |
| खर्च | ३५८७ | ४१०७ | ४१२४ |
| | +१४० | −२६ | +१३३ * |
| भांडवली उत्पन्न | २०२३ | २५८७ | २०९५ |
| भांडवली खर्च | २३९६ | २९४६ | २६८९ |
| | −३७३ | −३५९ | −५९४ |
| एकूण तूट | −२३३ | −३८५ | −३७५ |
| | | | +१३३ * |

* अर्थसंकल्पी सूचनांचा परिणाम. तरतूद करण्यात न आलेली तूट २४२ कोटी रु.

काश्मीरवरील हक्क रद्द झाला —काश्मीरमध्ये मुसलमानांची संख्या अधिक आहे म्हणून काश्मीर पाकिस्तानात आले पाहिजे असा पाकिस्तानचा दावा आहे. ' बाल्टिमोर सन ' या अमेरिकेतील वृत्तपत्राने या बाबतीत पाकिस्तानला असा इशारा दिला आहे की पूर्व पाकिस्तानात बंड होऊन बांगला देश उदयास आल्यावर पाकिस्तानच्या दाव्याचा पायाच कोसळला जाईल.




इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.



कारखानदार—

**न्यू विजय इंडस्ट्रीज लि.**

विश्रामबाग–सांगली ( महाराष्ट्र )


फोन : १३१ तार : IVwpijoay



कार्यक्षम आणि फायदेशीर पंपाची परीक्षा कशी कराल?

# किर्लोस्कर 'केडी' मोनोब्लॉक पंप

● पंपाची बांधणी मजबूत असल्याने झीज कमी व त्यामुळें दुरुस्तीचा खर्च कमी होतो.
● विजेच्या खर्चात बचत होते. ● कमी वेळात जास्त पाणी ओढू शकतो. त्यामुळे कामाचा जलद उरक व मजूरीच्या खर्चात बचत होते.




## खर्चात होणाऱ्या बचतीमुळे किर्लोस्कर 'केडी' पंपाची किंमत लवकर वसूल होते व कर्जफेडीची हमी देता येते.

सोपी रचना, सुबक कारागिरी, बळकट व आटोपशीर बांधणी या वैशिष्टयामुळें किर्लोस्कर 'केडी' पंप अधिक कार्यक्षम असून ते विपुल प्रमाणात पाणी पुरवठा करतात.

**किर्लोस्कर ब्रदर्स लि,** उद्योग भवन, टिळक रोड, पुणे २


हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९९५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )